# मधुमेहाची शिरगणती

## काल, आज आणि उद्या



# मधुमेहाची चिन्हे

पुष्कळ लघवी होणे, फार तहान लागणे

भूक फार लागणे, अशक्तपणा वाढणे,

वजन कमी होणे, अंगावर खाज सुटणे,

वारंवार गळवे होणे, जखम लवकर भरून न येणे.

# मधुमेहाची चिन्हे

काही वेळा मधुमेह त्यापासून उद्भवणाऱ्या

दुष्परिणामांचे सोंग घेऊन येतो. अर्धांगवायूचा झटका,

हृदयाचा झटका, उच्च रक्तदाब,

अतिलघवी व किडनीत बिघाड, बेशुध्दावस्था, लिव्हरचा बिघाड,

दृष्टीवर परिणाम,

पुळ्या-काळपुळी, अंगावर खाज-विशेषतः लघवीच्या जागी,

पाय सडणे .

# मधुमेहाची चिन्हे

काही वेळा मधुमेहाचा संशय येण्याचे कारण

वारंवार मुले जाणे, वजनदार मुले होणे,

वारंवार लघवीत पू होणे, क्षयरोग पटकन काबूत न येणे,

इतर असंबध्द आजार होणे असेही असते.

काही वेळा मधुमेहाचे निदान आकस्मिकपणे होते.

नोकरीपूर्व तपासणी, विम्यासाठीची तपासणी,

स्वास्थ्य-चिकित्सा तपासणी,

इतर काही कारणांनी केली जाणारी तपासणी, आदी.